सन २०२६-२७ या वित्तिय वर्षात (२२०२एच४५४),१०-कंत्राटी सेवा या उदिष्टांतर्गत घेण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह २०२६/प्र.क्र.२५ /संगणक
चौथा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. महाआयटी/मनुष्यबळ/ई-गव्ह-१४३ दि.२८.०३.२०२६.

२) प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक दि.११.०६.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध प्रकल्पांचे कामकाज करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.१३.०२.२०२५ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार महाआयटीकडील एकूण ३८ तांत्रिक मनुष्यबळास दि. ३१.०३.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.१३.०८.२०२५ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार ई-गव्हर्नन्स कक्षासाठी प्रस्तावित एकूण २२ पदांना देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत ई-गव्हर्नन्स अंतर्गत एकूण ६० तांत्रिक पदांना मान्यता आहे. सद्यस्थितीत ई-गव्हर्नन्स अंतर्गत कार्यरत विविध प्रकल्पांचे कामकाज सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने मंजूर ६० तांत्रिक मनुष्यबळास मार्च, २०२७ अखेरपर्यंत प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.११.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-गव्हर्नन्स लेखाशिर्ष (२२०२H४५४),१०-कंत्राटी सेवा यासाठी सन २०२६-२७ मध्ये रु.१० कोटी तरतूद मंजूर आहे. या अंतर्गत सन २०२६-२७ पासून तांत्रिक मनुष्यबळासाठीचे सेवाशुल्क व सेवानिवृत्त अधिका-यांसाठीचे मासिक पारिश्रमिक यापुढे ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), १०-कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाच्या मंजूर तरतूदीतून अदा करण्यास दि.११.०६.२०२६ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२६-२७ मध्ये तांत्रिक मनुष्यबळासाठीचे सेवाशुल्क व सेवानिवृत्त अधिका-यांसाठीचे मासिक पारिश्रमिक ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), १०-कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाच्या मंजूर तरतूदीतून अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी वाचा क्र.१ येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार सन २०२६-२७ या आर्थिक मध्ये तांत्रिक मनुष्यबळासाठीचे सेवाशुल्क व कार्यरत सेवानिवृत्त अधिका-यांसाठीचे

मासिक पारिश्रमिक ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२एच४५४), १०-कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाच्या मंजूर तरतूदीतून अदा करण्यास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च (०२) संकिर्ण (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), १०- कंत्राटी सेवा या लेखाशिर्षातून सन २०२६-२७ च्या उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका २०१५ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग- २ मधील अनुक्रमांक २७ अ मधील नियम क्र. ७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०६१५३१५२७७४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARJUN ASHOK GIRAHAM

Digitally signed by ARJUN ASHOK GIRAHAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=C1300422597C5149006FE3B151E37C83067DCDA2A588553017547485013232 3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=41524CD000BBC1D5D1FF212378815B6BE4870FD0FCD2031260BAA18314B15437, cn=ARJUN ASHOK GIRAHAM
Date: 2026.08.06 15:32:55 +05'30'

(अर्जुन गिऱ्हाम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

७) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) निवडनस्ती/संगणक.